रविवार, दि. २३ नोव्हेबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ९० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालन्यातील राजकीय हवामानात बदल; दानवे-लोणीकर एकाच फुलांच्या माळेत!

## आमच्यातला दुरावा संपलेला आहे राजकारणात आहे तोपर्यंत सोबत राहणार - दानवे

जालन्यातील राजकीय हवामानात बदल; दानवे-लोणीकर एकाच फ ुलांच्या माळेत!
आमच्यातला दुरावा संपलेला आहे राजकारणात आहे तोपर्यंत सोबत राहणार - दानवे

**परतुर । प्रतिनिधी -** मी आणि आमदार बबनराव लोणीकर यांनी, जिल्ह्यात भारतीय जनता पार्टी वाढवण्याचे काम केले काम करीत असताना खूप कष्ट हाल सोसले मात्र पक्ष वाढीसाठी काम करत राहिल्यानेच जिल्ह्यात भाजपा घराघरापर्यंत पोहोचली असे प्रतिपादन माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी केले

ते परतुर येथे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांच्या कार्यालयात संपन्न झालेल्या, नगरपरिषद निवडणूक, जिल्हा परिषद पंचायत समिति निवडणुकीच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर, भाजपा जालना महानगरचे जिल्हाध्यक्ष भास्करराव दानवे, भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांच्यासह प्रमुख पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती

पुढे बोलताना ते म्हणाले की आमच्यातला दुरावा आता संपला असून आम्ही दोघांनीही गेल्या ३५ वर्षांपूर्वी राजकारण सुरू केले होते सुरुवातीच्या काळात सोबत होतो मात्र नंतरच्या काळात निर्माण झालेला दुरावा आता संपलेला असून आम्ही राजकारणात आहोत तोपर्यंत एकत्र काम करणार असल्याचे यावेळी बोलताना रावसाहेब दानवे यांनी स्पष्ट केले

पक्ष उभारणीची पार्श्वभूमी सांगताना आमदार लोणीकर आणि मी सायकल मोटरसायकल वरून गावा गावांमध्ये फिरून संघटना मजबूत केली त्यामुळे जिल्ह्यात पक्षाला चांगले दिवस आल्याचेही त्यांनी यावेळी बोलताना सांगितले

यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, आमच्यात आता कुठलाही वाद नसून जिल्ह्याचे सर्व निर्णय आम्ही एक दिलाने घेणार आहोत सुरू असलेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये परतूरच्या नगराध्यक्षासह १५ जागावर भारतीय जनता पार्टी विजय होईल असा विश्वास यावेळी आमदार लोणीकर यांनी बोलून दाखवला

पुढे बोलताना माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, येत्या जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये येणाऱ्या परतूर मंठा भोकरदन जाफराबाद घनसावंगी बदनापूर जालना अंबड या पंचायत समित्या भाजपाच्या ताब्यात येणारा असून जिल्हा परिषदेमध्ये जिल्ह्यातून ३५ जिल्हा परिषदेचे सदस्य हे भारतीय जनता पार्टीचे निवडून येणार असल्याचे यावेळी बोलताना ते म्हणाले.

पुढे बोलताना लोणीकर म्हणाली की, दानवे आणि मी आमच्या दोघांच्या मतदारसंघाबरोबरच जिल्ह्याच्या विकासामध्ये मोठे योगदान दिलेल्या असून यापुढे जिल्ह्याच्या विकासासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे ते म्हणाले

यावेळी भाजपा प्रदेश सचिव राहुल लोणीकर म्हणाले की, दादा आणि भाऊंनी जिल्ह्याच्या प्रत्येक तालुक्याचा समतोल विकास व्हावा यासाठी प्रयत्न केलेल्या असून भाऊ व दादा मंत्री असताना जिल्हाभरात खूप मोठे काम उभे राहिले असल्याचे यावेळी त्यांनी नमूद केले

परतूर नगरपालिकेमध्ये निश्चितच भारतीय जनता पार्टीचा नगराध्यक्ष सत्तेवर बसणारा असून आम्ही दिलेले सर्व उमेदवार हे वेगवेगळ्या क्षेत्रातून आलेले असून प्रत्येकाने आपापल्या प्रभागात जनसेवा केलेले असल्यामुळे जनता आमच्या पाठीशी उभी असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले

**लोणीकर दानवे यांच्यातील दिल जमाईमुळे जिल्ह्यातील भाजपाचे पदाधिकारी खुश**

दरम्यान लोणीकर दानवेंना एकत्र बघून कार्यकर्त्यांनी आपली खुशी व्यक्त केली असून या दोघांच्या एकत्र येण्यामुळे पक्ष संघटनेच्या वाढीबरोबरच जिल्ह्याचा मोठा विकास होणार असल्याचे मग यावेळी अनेकांनी व्यक्त केले

यावेळी कार्यक्रमाला सिद्धिविनायक मुळे रमेश महाराज वाघ संदीप गोरे गणेश राव खवणे माऊली शेजुळ भाजपा तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे मंठा तालुकाध्यक्ष नितीन राठोड जालना ग्रामीण तालुकाध्यक्ष विक्रम उफाड जिल्हा सरचिटणीस रमेश भापकर युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष संपत टकले राजेश मोरे कैलास बोराडे गजानन देशमुख उत्तमराव राठोड गजानन उफाड संजय भगत गणेश जल्लेवार शिवाजीराव जाधव विठ्ठलराव काळे प्रसाद राव गडदे दीपक बोराडे माऊली तनपुरे आनंद जाधव भाजपा परतूर शहराध्यक्ष प्रवीण सातोणकर विलास घोडके बंडू मानवतकर संभाजी घनवट अर्जुन जगताप बंकटराव सोळंके विकास पालवे अंकुशराव बोराडे प्रकाशराव टकले नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार प्रियंका शहाजी राक्षे अर्जुन जगताप नितीन सरकटे शरद पाटील आतिश राठोड मोहनराव आडे नारायण काकडे दत्तात्रय काकडे सुजित जोगस शिवराज नारियल वाले संभाजी वारे तुकाराम सोळंके, गजानन लोणीकर सिताराम राठोड , संदीप बाहेकर, गणेश राव पवार, प्रकाश चव्हाण प्रमोद राठोड सुबोध चव्हाण सावता काळे कृष्णा आरगडे बालाजी सांगोळे मुज्जू ,कायमखानी, मलिक कुरेशी ज्ञानेश्वर जईद सोनू अग्रवाल एडवोकेट सुरेश काळे विजय यादव मुन्ना चितोडा नरेश कांबळे इंद्रजीत हिवाळे , यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांची उपस्थिती होती

### परतुर पालिकेत नगराध्यक्षांसह १५ जागावर भाजपाला विजय मिळणारच - आमदार लोणीकर



**जालना जिल्ह्यातील भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या गेल्या अनेक वर्षांतील इच्छा पूर्णत्वास गेली असून माजी खासदार रावसाहेब दानवे व आमदार बबनराव लोणीकर एकाच फ्रेममध्ये, एकाच पुष्पहारमध्ये...**

### आजचा दिवस भाजपासाठी ऐतिहासिक: पक्षात आता खरी एकजूट

परतूर येथे झालेल्या भाजपा कार्यकर्ता मेळाव्यात जालना जिल्ह्याच्या राजकारणात मोठे वळण पाहायला मिळाले. या मेळाव्यात माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे आणि परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर हे दोघे प्रथमच एका मंचावर दिसले. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून जिल्ह्यात सुरू असलेल्या चर्चांना आणि राजकीय अंदाजांना विराम मिळाल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

मेळावा आमदार लोणीकर यांच्या निवासस्थानी झाला. कार्यकर्त्यांची मोठी गर्दी, स्वागत फलक, घोषणांचा गजर आणि उत्साहपूर्ण वातावरणामुळे परतूर शहर राजकीय रंगात रंगले होते. मेळावा सुरू होताच घोषणांनी परिसर दणाणून गेला.

यावर प्रतिक्रिया देताना आमदार बबनराव लोणीकर यांनी मोठा निर्णय जाहीर केला. ते म्हणाले की आता ते परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघातून पुन्हा निवडणूक लढवणार नसून आगामी निवडणुकीत परभणी लोकसभा मतदारसंघातून लोकसभेची निवडणूक लढवून संसदेत प्रतिनिधित्व करणार आहेत. मतदारसंघातील विकासकामे, जनतेचा विश्वास आणि कार्यकर्त्यांचे योगदान हेच माझे राजकीय बळ असल्याचे त्यांनी सांगितले.

## कु त्रिवेणी तोगे हिची राज्यस्तर कॅरम क्रीडा स्पर्धेसाठी निवड

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** क्रीडा युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे व जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने व हिंगोली जिल्हा कॅरम असोशिएशन हिंगोली यांच्या सहकार्याने आयोजित विभागस्तरीय कॅरम क्रीडा स्पर्धा २०२५-२६ या स्पर्धा तालुका क्रीडा संकुल वसमत येथे दिनांक २१ व २२ नोव्हेंबर ला पार पडल्या या स्पर्धेत सम्राट अशोक शिक्षण प्रसारक मंडळ दहिपुरी संचलित माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर येथील विद्यार्थिनी कु त्रिवेणी विष्णू तोगे हिची राज्यस्तरासाठी १४ वर्ष या वयोगटात निवड झालेली आहे. तिला या शाळेतील स्काऊट मास्टर अब्दुल हकीम अब्दुल करीम या शिक्षकाने मोलाचे मार्गदर्शन केले तिच्या या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष आदरणीय चंद्रमणीजी खरात साहेब, सचिव अमोल भैय्या खरात मुख्याध्यापक श्री. ठाकूर डी. बी. ज्येष्ठ शिक्षक श्री राठोड पी. आर, उगले पी. एस, अंबडकर एस के, ढेबरे बी. ए, खरात ए. सी,शिंगणे के. बी, श्रीमती पनाड पी. यु,लिहिणार आर बी, खरात एस.पी. शिक्षकेतर कर्मचारी आणि गावकऱ्यांनी विशेष कौतुक करून अभिनंदन केले व रत्नागिरी या ठिकाणी होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.



## सकलेचा नगर-राजुर चौफुली रस्त्याच्या विकासाला गती

### आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मिळाले १५ कोटी यश

**जालना । प्रतिनिधी -** शहराचा चेहरा-मोहरा बदलण्यासाठी दर्जेदार रस्त्यांची गरज किती महत्त्वाची असते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे महापालिका हद्दीतील सकलेचा नगर ते राजुर चौक पर्यंतचा ढवळेश्वर मार्ग. जालना शहरातील वाढत्या जड वाहतुकीचा ताण या रस्त्याने अनेक वर्षे सहन केला असून परिणामी या मार्गाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत गेली. पावसाळ्यात तर स्थिती अधिकच गंभीर बनत असे-रस्त्यावर खड्ड्यांची खड्ड्यात भर पडत जाऊन वाहतुकीचा वेग संथ व्हायचा, वारंवार अपघात होत होते आणि नागरिकांना प्रवास करणे कठीण बनले होते.

या परिस्थितीबद्दल नागरिकांनी सतत आवाज उठवला. व्यावसायिक, विद्यार्थी, वाहनचालक, उद्योगधंद्यातील लोक-सर्वांनाच या रस्त्यावरील समस्येमुळे मनस्ताप सहन करावा लागत होता. अनेक वेळा स्थानिक पातळीवर दुरुस्तीच्या मागण्या झाल्या, परंतु हा रस्ता जड वाहतूक असलेला महत्त्वाचा मार्ग असल्याने कायमस्वरूपी आणि सक्षम उपाययोजना करण्याची आवश्यकता होती.

**आमदार खोतकर यांचा विषयावर ठाम पवित्रा**

या सर्व परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करून आमदार अर्जुनराव खोतकर यांनी हा प्रश्न केवळ रस्त्यासंबंधी नसून नागरिकांच्या जीवनमानाशी निगडित असल्याचे ओळखले. त्यांनी विस्तृत माहिती संकलित करून रस्त्याची अवस्था, वारंवार होणारे अपघात, वाढता वाहतूक दाब, विद्यार्थ्यी,नागरीकांचा प्रवास यासह सर्व महत्त्वाचे मुद्दे एकत्रित केले. सततच्या पाठपुराव्यानंतर त्यांनी हा प्रश्न थेट केंद्राच्या पातळीवर नेण्याचा निर्णय घेतला.

काही दिवसांपूर्वी नवी दिल्ली येथे त्यांनी केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री ना. नितीन गडकरी यांची भेट* घेऊन या रस्त्याच्या दुरुस्ती आणि मजबुतीकरणाची आवश्यकता सविस्तर मांडली. रस्त्यावरील वाढत्या वाहतूक आणि शहराच्या विस्तारामुळे या मार्गाचा विकास तातडीचा असल्याचे त्यांनी मंत्र्यांना पटवून दिले. बैठकीदरम्यान रस्त्याची वर्तमान स्थिती दर्शविणारे फोटोज, महापालिका अहवाल, वाहतुकीची आकडेवारी इत्यादी दस्तऐवजही सादर करण्यात आले.

**ना. गडकरी यांची तत्काळ दखल - १५ कोटी मंजुरी**

आमदार खोतकर यांनी मांडलेल्या मुद्द्यांचा सखोल विचार करून केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांनी या रस्त्याच्या विकासासाठी केंद्रीय मार्ग निधी (CRF) अंतर्गत १५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. ही मंजुरी म्हणजे जालना शहरासाठी मोठा दिलासा ठरला आहे. केंद्र सरकारच्या मंजुरीनंतर आता या रस्त्याचे सर्वेक्षण, तांत्रिक मान्यता, निविदा प्रक्रिया व कामाची सुरुवात या सर्व टप्प्यांना गती मिळणार आहे.



या निधीच्या मदतीने रस्त्यावर गुणवत्तापूर्ण रस्ता बांधकाम, साईड ड्रेनेज, संरक्षण भिंती, रस्ता रुंदीकरण, वाहतूक सुरक्षेसाठी आवश्यक मार्किंग व बोर्ड यांच्या उभारणीची कामे होणार आहेत. पूर्ण झालेला रस्ता पुढील अनेक वर्षे जड वाहतूक समर्थपणे सांभाळू शकेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

**नागरिकांमध्ये आनंदाची लाट**

निधी मंजूर झाल्याचे वृत्त लागताच जालना शहरात समाधानाचे वातावरण पसरले. परिसरातील रहिवासी, व्यावसायिक, वाहतूक चालकांनी रस्त्याची दुरुस्ती मंजूर झाल्याबद्दल आमदार खोतकर यांचे अभिनंदन केले. अनेकांनी करून आनंद व्यक्त केला.

व्यावसायिक संघटनांनीही या निर्णयाचे स्वागत केले आहे. त्यांच्या मते, हा रस्ता तयार झाल्यानंतर व्यापाराची गती वाढेल, प्रवासाचा वेळ कमी होईल, अपघाताचे प्रमाण घटेल आणि शहराची वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम बनेल.

**आमदार खोतकर यांची प्रतिक्रिया**

निधी मंजूर झाल्याची माहिती देताना आमदार खोतकर म्हणाले, हा रस्ता जालना शहराचे महत्त्वाचे वाहतूक केंद्र आहे. नागरिकांच्या हालअपेष्टा प्रत्यक्ष पाहिल्या आणि हा प्रश्न केंद्राकडे नेणे आवश्यक वाटले. मा. नितीनजी गडकरी यांनी तात्काळ सकारात्मक निर्णय घेतल्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे. हा रस्ता पूर्ण झाल्यानंतर जालना विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वाचा टप्पा गाठेल.

**रस्त्याच्या विकासानंतर काय बदलणार?** वाहतुकीचा वेग वाढणार, अपघातांचे प्रमाण कमी होणार, व्यावसायिक हालचालींना गती मिळणार, विद्यार्थ्यांचा व नागरिकांचा दैनंदिन प्रवास सुरक्षित होणार, शहराचा दक्षिण -उत्तर भाग अधिक सुलभपणे जोडला जाणार ही बाब अत्यंत महत्वाची आहे.

# संपादकीय पान

जालना महापालिका आरक्षण दुरुस्ती प्रकरण :

## निवडणूक आयोगाच्या प्रक्रियेतील 'नैसर्गिक न्याय' कुठे?

जालना शहर महानगरपालिका निवडणूक-२०२५ च्या आरक्षण प्रक्रियेत राज्य निवडणूक आयोगाने (SEC) केलेल्या अचानक दुरुस्ती आदेशावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत. काँग्रेसचे गणेश चांदोडे आणि युवक काँग्रेसचे प्रदेश सचिव सुरज यलगंठवार यांनी दाखल केलेल्या हरकतीनुसार, आयोगाने नियमबाह्य, एकतर्फी आणि कायदेशीर प्रक्रियेचा भंग केला असल्याचा आरोप आहे. या आरोपांचे गांभीर्य लक्षात घेतले तर हे प्रकरण केवळ जालना महापालिकेपुरते मर्यादित नसून, स्थानिक स्वराज्य निवडणुकांवरील विश्वासार्हता आणि पारदर्शकता रक्षण करण्याचा प्रश्न आहे.

**आरक्षण सोडतीची कायदेशीर प्रक्रिया ; नियम काय सांगतात?** राज्य निवडणूक आयोगाचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आरक्षण सोडत व दुरुस्ती संदर्भातील नियम स्पष्ट सांगतात: आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर आयोगाने निर्धारित हरकत कालावधी देणे बंधनकारक असते (सामान्यतः ७-१० दिवस). या कालावधीत सर्व नागरिक, संघटना, आणि संभाव्य उमेदवारांना आपली हरकत किंवा सूचना नोंदवण्याचा कायदेशीर अधिकार असतो. हरकत कालावधी संपल्यावरच आयोगाने सर्व हरकतींचे परीक्षण करून अंतिम दुरुस्ती आदेश जाहीर करायचा असतो. एका तक्रारदाराच्या पत्राच्या आधारावर किंवा हरकत कालावधी सुरू होण्याआधी आरक्षणात बदल करणे नियमांचे उल्लंघन मानले जाते. यालाच प्रकियात्मक न्याय (Procedural Fairness) आणि नैसर्गिक न्यायाचा सिद्धांत (Principle of Natural Justice) म्हणतात. याचा मूळ अर्थ सर्वांना ऐकले गेले पाहिजे आणि सर्वांना समान संधी दिली गेली पाहिजे. जालन्यात ११ नोव्हेंबरला आरक्षण सोडत जाहीर झाली. १७ ते २६ नोव्हेंबर हा अधिकृत हरकत कालावधी. परंतु १४ नोव्हेंबरलाच आयोगाने प्रभाग १ आणि ७ चे आरक्षण बदलून टाकले. हरकत कालावधी सुरू होण्यापूर्वीच दुरुस्ती आदेश. नागरिक, संभाव्य उमेदवार, सामाजिक संघटना सर्वांनाच मत व्यक्त करण्याची संधी मिळाली नाही. यामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत दुरुस्तीची इतकी घाई का? एका तक्रारदाराच्या म्हणण्यावर एकतर्फी निर्णय का? सर्व नागरिकांचे निवडणूक प्रक्रियेतील सहभागाचा अधिकार कुठे गेला? दबावाखाली निर्णय झाला का? कायदेशीर प्रक्रियेचा भंग झाला का? काँग्रेस नेत्यांचा आरोप आहे की ही घाई विशिष्ट फायदेशीर गटाला मदत करण्यासाठी केली गेली अशी शंका जनतेमध्ये वाढत आहे. कायद्यातील हा मूलभूत तत्त्व सांगतो की, निर्णय घेण्याआधी सर्व संबंधित पक्षांना ऐकलेच पाहिजे. येथे नागरिकांना ऐकलेच गेले नाही. निवडणूक आयोग हे स्वतंत्र व निष्पक्ष संस्थेचे प्रतीक आहे. पण दुरुस्ती आदेश गुप्तपणे, अचानक आणि कालावधीपूर्वी का? आरक्षण सोडत ही जनतेसाठी खुली प्रक्रिया असते. येथे ती बंद दाराआड सरकवली गेल्याची भावना निर्माण झाली. जर ही दुरुस्ती प्रक्रिया चुकीची आढळली तर दुरुस्ती आदेश निरस्त ठरू शकतो. संपूर्ण आरक्षण प्रक्रिया पुन्हा सुरू करावी लागू शकते. यामुळे संपूर्ण निवडणूक कार्यक्रमात विलंब संभवतो. कायदेशीररीत्या वंचित ठेवलेल्या नागरिकांना न्यायालयीन दिलासा मिळू शकतो. निवडणूक आयोगाला उत्तर द्यावेच लागेल. सर्व नागरिकांना समान संधी देऊन तटस्थ चौकशी करावी, आणि आवश्यक असल्यास आरक्षण प्रक्रिया पुन्हा व पारदर्शक पद्धतीने करावी. कारण लोकशाहीत विश्वास गमावणे हीच सर्वात मोठी हानी असते - निवडणूक आयोगासाठीही, आणि जनतेसाठीही.

अनाथ आश्रम नव्हे योग्य शब्द आहे बालगृह

## मुलांच्या सन्मानासाठी भाषेत बदलण्याची आजची गरज

समाजात वापरले जाणारे शब्द आपल्या विचारांना आकार देतात आणि विशेषतः मुलांविषयी बोलताना भाषा हि केवळ संवाद नसते; ती त्या मुलांच्या ओळखीशी जोडलेली असते. तरीही आपण आजही संस्थांमध्ये राहणाऱ्या मुलांविषयी बोलताना सहजपणे अनाथ आश्रम हा शब्द वापरतो. परंतु हा शब्द ना कायद्यात आहे, ना योग्य आहे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे तो मुलांच्या सन्मानाला धक्का देणारा आहे.

भारताच्या आधुनिक बालसंगोपन व्यवस्थेत संस्थांना अनाथ आश्रम म्हणणं हे वास्तवापासून आणि संवेदनशीलतेपासून दोन्हीकडून दूर जातं. त्यामुळे समाजाला, माध्यमांना, CSR क्षेत्रात काम करणाऱ्यांना आणि सर्वसामान्य नागरिकांना या संज्ञेबद्दल जागरूक करणे अत्यावश्यक झाले आहे.

**कायद्यानुसार योग्य शब्द कोणते?**

Juvenile Justice (Care and Protection of Children) Act हा देशातील मुलांच्या संरक्षणाचा मुख्य कायदा आहे. या कायद्यानुसार भारतात मुलांच्या निवासी संस्थांना Child Care Institution (CCI) असे संबोधले जाते. त्याचे तीन सर्वात योग्य मराठी पर्याय आहेत.

बालगृह, निवासी बालसंस्था, बाल संगोपन संस्था

महत्त्वाचं म्हणजे- कायद्यात कुठेही अनाथ आश्रम असा शब्द नाही. म्हणजेच अनाथ आश्रम ही केवळ लोकव्यवहारातील जुनी संज्ञा आहे; कायदेशीर वा तांत्रिकदृष्ट्या ती चुकीची आहे. संस्थांतील बहुतेक मुलं अनाथ असतात का? सत्य धक्कादायक आहे समाजात असा एक गैरसमज पक्का बसला आहे की संस्थेत राहणारी मुलं म्हणजे अनाथ. प्रत्यक्षात बहुतेक मुलांचे पालक जिवंत असतात.

तर नाही तर ती मुलं संस्थेत का असतात?

काहींना बालविवाह, बालमजुरी किंवा अत्याचारातून वाचवलेले असते. तर काहींना घरातील हिंसा, अत्याचार किंवा लैंगिक शोषणातून तर काही घरात दुर्लक्ष किंवा असुरक्षित वातावरण असतं.काही अत्यंत दारिद्र्यात असतात, त्यात पालकांची मानसिक आजारपण असतात, काही पालकांची व्यसनाधीनता भयानक असते, काही मुलं हरवून आलेली असतात,तर काही मानव तस्करीपासून बचावा दरम्यान भेटलेली असतात, सध्याच्या परिस्थितीत एकल पालकाची संकट, त्यांची महागाई मुळेची बाहेर कमवायला जायची आव्हान ही खूप जास्त आहेत.कधी कधी समाजातील गुन्हेगारांच्या किंवा धोक्याच्या भीतीने ही मुलं घरापासून दूर ठेवावी लागतात.तर अनेक प्रकरणांत कोर्ट मुलांना तात्पुरत्या संरक्षणासाठी बालगृहात ठेवते.

एकूण काय तर ही मुलं अनाथ नसतात. तर ते त्या विशिष्ट परिस्थितीचे बळी असतात. म्हणून सांगायचा मुद्दा हाच कि, त्यांना अनाथ म्हणणं म्हणजे त्यांच्या जगण्यावर चुकीचा शिक्का मारणं आहे. मी स्वतः २०१० साली अशा मुलींसाठी एका बालिकागृहात कार्यरत होते तेव्हा अनेक वेळा वेगवेगळे अनुभव आले त्यापैकी काही लक्षात राहण्यासारखे त्यापैकी एक अनुभव मी संस्था आणि शाळा एकत्रित होती त्यामुळे सहज बाहेर फेरी मारताना मधल्या सुट्टीत काही चिमुरड्या खेळत होत्या त्यांच्यामध्ये काही बोलणं सुरू होतं ते त्यांच्या नकळत मी ही ऐकलं.

एक तिसरीत शिकणारी जुई (नाव बदललेले) एका दिवशी शाळेत आपल्या मैत्रिणीला सहज सांगते, मी शाळेनंतर माझ्या घरी नाही, संस्थेत राहते. मैत्रीण लगेच विचारते, का? तू अनाथ आश्रमात राहतेस का? हे निरागस प्रश्न तिच्या चेहऱ्यावर दाटलेलं दुःख अधिकच गडद करतात. जुई हळू आवाजात म्हणते- नाही माझी आई आहे. पण तिथे माझ्यासाठी राहणं सुरक्षित नाही.( तीची आई एकल माता होती तीच्या आईला घटस्फोट देऊन सोडलं होतं , पुढे तिची आई माहेरी आली तर आई वडील नव्हते तर भाऊ भावजय ने तु रहा पण त्या माणसाचं मुलं आमच्या घरी नको ज्याने आमच्या बहिणीचं आयुष्य खराब केलं तर त्या आईला इतर खर्चासाठी नोकरी करणं गरजेचं होतं.

हे ऐकताना मीही थबकले. त्या क्षणी जाणवलं अनाथ आश्रम हा शब्द केवळ चुकीचा नाही; तो एका मुलाची ओळख बदलून टाकतो. भारतभरातील हजारो मुलं जुईसारखीच परिस्थिती अनुभवत असतात. त्यांच्यासाठी शब्द ही जखम उघडणारी गोष्ट असते.

अनाथ आश्रम हा शब्द का टाळावा? मुलांच्या ओळखीवर अन्याय, अनाथ हा शब्द मुलाला आयुष्यभरासाठी कमीपणाची ओळख देतो., मानसिक परिणाम- लहान वयात अशा शब्दांचं दुखणं फार खोलवर बसतं. समाजात चुकीचा समज - लोकांना वाटतं की ही मुलं कोणीच नसलेली आहेत; जे पूर्णपणे चुकीचं आहे. कायद्याशी विसंगत - असा शब्द कोणत्याही सरकारी कायद्यात, धोरणात किंवा मार्गदर्शक तत्वांत नाही.

'बालगृह' हा शब्दच का योग्य?

अनाथ आश्रम हा शब्द इतिहास, दया आणि दीनता दर्शवतो.

बालगृह हा शब्द- घर, आधार, सुरक्षा, माया, रक्षण, सन्मान, -या सर्व संकल्पना दर्शवतो.

आजच्या बालगृहांमध्ये फक्त छत नसतं; तर तेथे असतं शिक्षण, समुपदेशन, वैद्यकीय काळजी, मनोवैज्ञानिक समर्थन, कौशल्य प्रशिक्षण, पुनर्वसन व पुनर्मिलन, बालहक्कांनुसार सर्व सुविधा, हे घर असतं-तात्पुरत्या काळासाठी, पण सुरक्षिततेसाठी अत्यावश्यक.

खरं तर भाषा बदलली की आपल्या समाजाचा दृष्टिकोन ही बदलतो आणि खरं सांगायचं तर फक्त एक शब्द बदलला की संपूर्ण समाजातील वागणूक बदलते. म्हणूनच माध्यमांनी, वृत्तपत्रांनी, उडठ प्रकल्पांमध्ये काम करणाऱ्यांनी, समाजकार्यकर्त्यांनी आणि सर्वसामान्य नागरिकांनी अनाथ आश्रम हा शब्द टाळून बालगृह हा शब्द वापरणं ही काळाची मागणी आहे.

शेवटची काही प्रश्नं-आपण स्वतःलाच विचारायची एका मुलाच्या ओळखीत आपण का चुकीचे शब्द वापरावेत? आपल्या भाषेने मुलाला लाज वाटावी की सन्मान? आपण शब्द बदललो तर एखाद्या मुलाच्या मनावरील दुखणं थोडं कमी होऊ शकतं का? उत्तर स्पष्ट आहे- हो, नक्कीच. त्यामुळे किमान मला तरी असं वाटतं की, संस्थांमध्ये राहणारी मुलं दयेची पात्र नाहीत; ती हक्कांची, सन्मानाची आणि सुरक्षिततेची पात्र आहेत. म्हणून पुढच्या वेळी बोलताना, लिहिताना, सोशल मीडियावर पोस्ट करताना, उडठ रिपोर्टमध्ये किंवा समाजकार्याशी संबंधित लेखनात आपण जर अनाथ आश्रम हा शब्द टाळूया. बालगृह, निवासी बालसंस्था किंवा CCI हे शब्द वापरूया. संस्थेत राहणारी मुलं दयेची पात्र नाहीत. ती सुरक्षिततेची, आधाराची आणि सन्मानाची पात्र आहेत. मुलांच्या मनावर जखम करणारा शब्द वापरणे की त्यांच्या आत्मसन्मानाला बळ देणारा- याचा निर्णय आज तुम्ही, आपण, समाज म्हणून घ्यायचा आहे. कारण भाषा बदलली की समाज संवेदनशील होतो.



आणि संवेदनशीलता हीच मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठीची पहिली पायरी आहे. आपल्या समाजातील आपली भावी पिढी मानसिक दृष्ट्या सक्षम सुदृढ ही आपणचं करु या

**अस्मिता चौगुले**
**लेखिका समुपदेशक,**
**सामाजिक कार्यकर्त्या व बालहक्क कार्यकर्त्या आहेत**

## केंद्रस्तरावरील प्रश्नमंजुषा स्पर्धेत दुधा शाळेचे दोन्ही संघ यशस्वी



**विशाल देशमुख**

**टैंभूर्णी** - केंद्रस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा शाळेचे दोन्ही संघ विजयी किरला केंद्रांतर्गत घेण्यात आलेल्या केंद्रस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा या शाळेच्या विद्यार्थ्यांनी प्रथम गट एक ते पाच मध्ये व दुसरा गट सहा ते आठ मध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे यामध्ये वर्ग पहिली ते पाचवीच्या गटामध्ये अनिकेत भागवत देशमुख, दिशा रामेश्वर जाधव, अमर सतिष खुळे व वर्ग सहा ते आठ च्या दुसऱ्या गटांमध्ये सार्थक रामेश्वर खुळे,स्नेहल संजय जाधव व भाग्यश्री गोकुळ शिंदे या विद्यार्थ्यांनी प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये विचारलेल्या प्रश्नाचे अचूक उत्तर देऊन प्रथम क्रमांक मिळविला त्यामुळे या सर्व विद्यार्थ्याचे विद्यार्थ्याचे केंद्रप्रमुख श्री खरात सर मुख्याध्यापक श्री कांगणे सर शिक्षक श्री निलेश पिसे सर श्री पंजाब दांदडे सर शाळा व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत आणि पालक यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

## कुपोषणमुक्ती; गरज सर्वंकष प्रयत्नांची!

राज्यातील मेळघाट आणि गडचिरोली जिल्ह्याच्या दुर्गम भागातील बालकुपोषणाची तीव्रता गेल्या अनेक वर्षांपासून कायम आहे. त्यात शहरी भागात आढळणाऱ्या बाल कुपोषणाची तीव्रता भर घातली आहे. राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात राज्यातील कुपोषण कमी करण्याच्या उपाययोजनेबाबत सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्यावरील लेखी उत्तरात महिला व बालविकास विभागाच्या वतीने कुपोषित बालकांची आकडेवारी उघडीस आली. त्यानुसार, राज्यात सर्वाधिक तीव्र कुपोषित बालके मुंबई उपनगरात असल्याचे धक्कादायक माहिती उघड झाली.या आकडेवारीनुसार,राज्यात एक लाख अठ्ठ्याशी हजार चारशे त्रेचाळीस कुपोषित बालके आहेत.त्यापैकी तीस हजार आठशे बालके तीव्र कुपोषित श्रेणीत आहे. तर एक लाख एक्कावन हजार सहाशे त्रेचाळीस बालके मध्यम कुपोषण श्रेणीत आहे. तीव्र व मध्यम कुपोषित बालकांच्या संख्येत राज्यातील मुंबई उपनगर,नाशिक, पुणे, नागपूर आणि धुळे जिल्ह्यातील बालकांचे प्रमाण अधिक आढळून आले होते. अमरावती जिल्ह्यातील मेळघाट प्रदेशातील कुपोषणामुळे बालमृत्यूंचे प्रमाण अत्यंत गंभीर श्रेणीत पोचले आहे. चालू वर्षाच्या जून ते ऑगस्ट या तीन महिन्यात मेळघाटात तब्बल ६५ कुपोषित बालकांचा मृत्यू झाला. या प्रकरणाची दखल स्वतः माननीय उच्च न्यायालयाने घेतली आहे. मेळघाट परिसरात पद्मश्री पुरस्कार प्राप्त डॉ. अभय बंग आणि डॉ. राणी बंग या दाम्पत्याच्या नेतृत्वात 'सर्च'ही स्वयंसेवी संस्था मागील ३०-३५वर्षांपासून खूप कुपोषणाच्या समस्येवर मेळघाटात संवेदनशीलतेने कार्ये करीत आहे. याउलट राज्यातील महिला व बाल कल्याण विभाग, सार्वजनिक आरोग्य सेवा मेळघाटातील कुपोषण नियंत्रणात राज्य शासनाची उदासीनता दिसून येते, असा ठपका उच्च न्यायालयाने ठेवला आहे. या प्रकरणामुळे पुन्हा एकदा राज्यातील कुपोषितांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

विद्यमान परिस्थितीत राज्यात ग्रामीण भागातील वाढत्या कुपोषणाच्या संदर्भात, सामाजिक व आर्थिक विषमता, पोषण आहाराचा अभाव आणि अपुरी आरोग्य व्यवस्था हे घटक कारणीभूत आहे. तर शहरी भागातील कुपोषणाच्या प्रमुख कारणांमध्ये ग्रामीण भागातून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतरित मजुरांची वाढती संख्या होय. तसेच त्यांचे अत्यंत निकृष्ट जीवनमान मानले पाहिजे. खेड्यातून रोजगारासाठी महानगरांकडे स्थलांतरित होणाऱ्या या कुटुंबीयांना ना पुरेशी आरोग्य सुविधा असते, ना सकस पोषण आहार, ना शुद्ध पिण्याचे पाणी. हात मजुरीवर काम करणाऱ्या लाखो कुटुंबावर दोन वेळेचे पोटभर अन्न मिळण्याची क्षमता नाही. त्यात निरक्षरता, आर्थिक चणचण, महिला व बालकांच्या आरोग्याची होणारी हेळसांड,वाढती महागाई, ढासळती आर्थिक परिस्थिती अशा अगणित समस्यांच्या गर्तेत मुलांना सकस आहाराचा पुरवठा पाल्यांच्या आवाक्या बाहेरचा ठरतो. आज सकस पोषण आहाराच्या अभावामुळे कुपोषणाची तीव्रता वाढत आहे.

बाल कुपोषण कमी करण्याच्या संदर्भात राज्य शासनाच्या अनेक योजना कार्यान्वित आहेत. लाखो आरोग्य कर्मचारी, विविध टास्क फोर्स, शिबिरे सुद्धा उभारली जातात. आर्थिक बजेटमध्ये तरतुदी केली जाते. तरीसुद्धा बाल कुपोषणाची तीव्रता दिवसेंदिवस वाढताना दृष्टीस पडते. शासन पातळीवर 'इंटिग्रेटेड चाइल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिसेस' , 'मिशन पोषण २.0', 'सुपोषण अभियान' अशा योजनांची आखणी आहे. परंतु याही योजना नेहमीप्रमाणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. शहरी भागातील बालकुपोषण हे स्थलांतरित कुटुंबीयांच्या बालकांची संबंधित आहे.यातील बालके शाळाबाह्य आहेत. त्यामुळे शालेय पोषण आहाराचा कुठलाही लाभ यांना मिळत नाही. कुपोषणाच्या बाबतीत पोषण शिक्षण हे महत्त्वाची बाब आहे. मात्र त्याची पूर्तता सुलभ होणे जरुरीचे आहे.



राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते. ही योजना मुख्यत्वे शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांच्या भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासासाठी आहे.पोषणयुक्त आहार, लसीकरण,आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातून देण्याचा व्यापक प्रयत्न व्हायला हवा.

राज्यातील कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील अंगणवाड्या आज स्वतःच्या इमारतीविना आहेत. समाज मंदिरात, पत्रांच्या शेडमध्ये, भाड्याच्या जागेत, तर कुठे उघड्या झाडाखाली सुद्धा भरतात. त्यात मोठी सुधारणा आज अपेक्षित आहे. बाल कुपोषणाच्या समस्येवर मात करीत असताना कुपोषित बालकांच्या पालकांचे स्थलांतर थांबवले पाहिजे. कुपोषित बालकांच्या कुटुंबांचे विशेष सर्वेक्षण करून पुनर्वसन कोणीही गरजेचे ठरते.

कुपोषणाची समस्या ही आरोग्याशी संबंधित नव्हे तर विकासाची आणि आर्थिक प्रगतीची समस्या आहे. त्यामुळे बाल कुपोषण नियंत्रणासाठी प्रामाणिक प्रयत्न होणे आवश्यक आहे. असे झाले,तर राज्यात कुपोषण मुक्तीची पहाट नक्कीच उजाडेल.

**शशिकांत म. तोर्टे दारव्हा,**
**जि.यवतमाळ मो:९१३०८३५४५८**
ई मेल:
shashikanttote1979gmail.com

## नळविहिरा ग्रामपंचायतच्या उपसरपंच पदी चंद्रभागाबाई मोरे यांची निवड



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी** - नळविहिरा ग्रामपंचायत च्या उपसरपंच पदी चंद्रभागाबाई सुखदेव मोरे यांची गुरुवारी ता.२० बिनविरोध निवड करण्यात आली.उपसरपंच निवडीसाठी ग्रामपंचायत सभागृहात सरपंच प्रीती निवृत्ती जंजाळ यांच्या अध्यक्षतेखाली विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती.सदर पदासाठी सौ.मोरे यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची या पदावर बिनविरोध निवड करण्यात आली.यावेळी प्रीती निवृत्ती जंजाळ,सदस्य भागुबाई भिकाजी गाडेकर, वसंता फकीरबा गाडेकर, बेबाबाई रामभाऊ गायकवाड, अविनाश शिवाजी गायकवाड, द्रोपदी अरुण गाडेकर,उषा आकाश वाकोडे यांची उपस्थिती होती.त्यांच्या निवडीची घोषणा होताच फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.त्यांच्या निवडीचे ग्रामस्थानी अभिनंदन केले आहे.यावेळी भिकाजी गाडेकर, रामकिसन मोरे, दामोदर मोरे सुधाकर गाडेकर, सुनील गायकवाड, नारायण मोरे,संजय मोरे, प्रल्हाद गाडेकर व शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष शंकर गाडेकर ,अंकुश गाडेकर, पवन गाडेकर, सुधाकर मोरे यांच्यासह नागरिकांची उपस्थिती होती.

## त्या चार ग्रामपंचायतींना प्रशासकीय मान्यतेचे आदेश तात्काळ द्या

### रामधन कळंबे यांनी गट विकास अधिकाऱ्यांना धरले धारेवर

**विशाल देशमुख**

**जाफराबाद** - तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात असणाऱ्या ग्रामपंचायतींची प्रशासकीय मान्यता आदेश सत्ताधाऱ्यांच्या दबावाखाली येऊन गटविकास अधिकारी जाणीवपूर्वक देत नसल्याच्या निषेधार्थ आज गुरुवारी २० राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जाफराबाद तालुका अध्यक्ष रामधन कळंबे यांनी गट विकास अधिकारी नारायण खिल्लारे यांना चांगले धारेवर धरले. जाफराबाद तालुक्यातील घाणखेडा,देऊळगाव देवी या ग्रामपंचायतींच्या इमारत बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता झालेली असताना पंचायत समिती गटविकास अधिकारी नारायण खिल्लारे यांनी विद्यमान आमदार यांच्या स्विय्य सहाय्यक यांना सदर प्रशासकीय मान्यतेचे आदेश परस्पर देऊन टाकलेले आहेत. एका इमारत बांधकामासाठी तब्बल २० लक्ष इतका निधी उपलब्ध झालेला आहे आणि सदर कामांचे टेंडर ग्रामपंचायत ने करायचे आहे यापूर्वी सुद्धा निमखेडा बुद्रुक आणि पिंपळगाव कड या ग्रामपंचायतीच्या प्रशासकीय मान्यता अशाच पद्धतीने गायब करण्यात आलेले आहेत. सदर प्रशासकीय मान्यता तात्काळ देण्यात याव्यात अन्यथा पंचायत समितीच्या कार्यालयाला कुलूप ठोकण्याचा इशारा श्री कळंबे यांच्यासह संबंधित ग्राम संसदेच्या सरपंचांनी दिल्यानंतर सोमवारी या प्रशासकीय मान्यता सदर ग्रामपंचायतींना प्रदान करण्यात येतील असे आश्वासन यावेळी गटविकास अधिकारी नारायण खिल्लारे यांनी दिले.

मराठवाडा शिक्षक संघाची बीड येथे तक्रार निवारण बैठक संपन्न!

## बैठकीतच अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी!



**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी -** मराठवाडा शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांची शिक्षणाधिकारी (माध्यमिक) बीड मा प्रियाराणी पाटील यांच्या समवेत तक्रार निवारण बैठक अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. अनेक प्रलंबित प्रश्न बैठकीतच सोडविण्यात आले तर काही प्रश्न ठराविक कालमर्यादेत सोडविण्याचा निर्णय घेण्यात आला.

या बाबत अधिक माहिती अशी की, शिक्षणाधिकारी माध्यमिक स्तरावरील आणि शालेय स्तरावरील प्रलंबित प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मराठवाडा शिक्षक संघाने मा शिक्षणाधिकारी माध्यमिक समवेत तक्रार निवारण बैठक आयोजित करण्याची विनंती केली होती. त्यानुसार बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मराठवाडा शिक्षक संघाचे मार्गदर्शक पी. एस. घाडगे, अध्यक्ष सूर्यकांत विश्वासराव, सरचिटणीस राजकुमार कदम, मार्गदर्शक डी.जी. तांदळे, जिल्हाध्यक्ष कालिदास धपाटे, जिल्हा सचिव गणेश आजबे, केंद्र कार्यकारिणी सदस्य अशोक मसकले, बंडू आघाव, विनोद सवासे यांनी संघटनेच्या वतीने भागिदारी केली तर मा प्रियाराणी पाटील, अजय बहीर, अधीक्षक(माध्यमिक), राजेश खटावकर अधिक्षक वेतन व भनिनि पथक, नानाभाऊ हजारे उपशिक्षणाधिकारी माध्यमिक,जेष्ठ लिपिक श्री तावडे शिक्षणाधिकारी माध्यमिकच्य वतीने बैठकीत भागिदारी केली. बारा व चोवीस वर्षाच्या अर्हताकारी सेवे नंतर देय्य प्रलंबित वरिष्ठ व निवड प्रकरणे निकाली काढण्या बाबत तातडीने कार्यवाही करण्याचा निर्णय घेण्यात आला. सहाव्या व सातव्या वेतन आयोगाच्या प्रलंबित फरकाचे हप्त्यां बाबत उचित कार्यवाही करणे, प्रलंबित वैद्यकीय प्रतिपूर्ती देयके तातडीने जमा करण्याचे आदेश निर्गमित करण्या बाबत निर्णय घेण्यात आले. निवड श्रेणी, वरिष्ठ श्रेणी, वैद्यकीय प्रतिपूर्त्ती देयकाका बाबतची अनेक वैयक्तिक प्रकरणे बैठकीतच निकाली काढण्यात आली. याप्रसंगी संघटनेच्या वतीने शिक्षण; प्रश्न अनेक- ऊत्तर एक ज्ञानोबा वरवट्टे गौरव ग्रंथ मान्यवरांना भेट देण्यात आला.

## श्रीमती.जे.बी.के विद्यालयात शिक्षक पालक मेळावा उत्साहात संपन्न

**विशाल देशमुख**
**टेंभुर्णी -** शहरातील नवभारत शिक्षण संस्था द्वारा संचालित. श्रीमती. जे.बी.के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात २० नोव्हे.२०२५ रोजी इ.१० वी, व इ.१२वीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा शिक्षक पालक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला, नवभारत शिक्षण संस्थेचे आधारवड- स्वर्गिय. गोपिकिशन काबरा यांच्या स्मरणार्थ विद्यालयात आयोजित शिक्षक पालक मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी. शिक्षण संस्थेचे सचिव. सत्यनारायण सोनी हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक पालक संघ समितीचे उपाध्यक्ष. मनोज पंडित,संचालक. प्रा.डि.एस. देशमुख, मुख्याध्यापक. व्हि. के.जाधव, सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख. एस.बी.बोरकर, रेखाताई सपकाळ सुरेश साळुंखे, किशोर कांबळे, शांताराम पवार, राजु गवई, संतोष साळवे, आदींची प्रमुख उपस्थिती होती. सुरूवातीला क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, स्वागतगीताने मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक. व्हि.के.जाधव यांनी आपल्या प्रास्ताविकात शिक्षक पालक मेळावा आयोजित करण्या मागची भूमिका व उद्देश या विषयावर आपले मत मांडले, शिक्षक पालक मेळाव्यात *इ.१० वी, व १२ वी च्या विद्यार्थ्यांनी बोर्ड परिक्षेला सामोरे जातांना घ्यावयाची काळजी,
*विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षक आणि पालक यांची भूमिका,
*विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, मानसिक, भावनिक, शारीरिक विकासा साठीच्या उपाययोजना, *कॉपी मुक्त, भयमुक्त वातावरणात परिक्षेला सामोरे जातांना घ्यावयाची काळजी.या संबंधित मुद्द्यांवर शिक्षक आणि पालक यांनी आप -आपले मत मांडले, विद्यार्थी मोबाईलच्या अतीआहारी गेल्यामुळे होणारे नुकसान, अभ्यासाकडे होणारे दूर्लक्ष, या बाबतीत शिक्षक पालक मेळाव्यात सकारात्मक विचार मंथन करण्यात आले, अनेक पालकांनी विद्यार्थ्यांच्या हितासाठी आयोजित केलेल्या या पालक मेळाव्याचे आयोजन कौतुकास्पद असल्याचे व विद्यालयाचा हा उपक्रम स्तुत्य असल्याचे मत मांडले.कार्यक्रमाचे अध्यक्ष.सत्यनारायण सोनी यांनी आपले मत मांडत असतांना पालक आणि शिक्षक यांच्यातील सुसंवाद विद्यार्थ्यांच्या विकासासाठी



किती आवश्यक आहे,व विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेऊन शिक्षक व पालकांनी भूमिका पार पाडली तर विद्यार्थी आपल्या जीवनात कसा यशस्वी होऊ शकतो या बाबतीत आपले मत मांडले, शिक्षक पालक समितीच्या सदस्या रेखाताई सपकाळ यांनी विद्यार्थ्यांचे आरोग्य, त्यांच्या सवयी, चौरस आहार,त्यांचे शारीरिक मानसिक,भावनिक, बदल व विद्यार्थ्यांच्या बाबतीत शिक्षक व पालक यांनी सकारात्मक प्रतिसाद कसा द्यावा या बाबतीत आपले मत मांडले. शिक्षक पालक मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक. एस.बी.बोरकर यांनी संस्कारक्षम पिढी निर्माण करण्यासाठी पालक आणि शिक्षक कटीबद्ध असले पाहिजे तरच भारताचे आदर्श नागरिक घडतील असे मत व्यक्त केले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन.भिवसन ससाणे यांनी केले तर आभार प्रदर्शन राजेंद्र जगताप यांनी मानले. शिक्षक पालक मेळाव्यात पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमेश इंगळे, संजय कुलकर्णी, कैलास भुतेकर, राजेश शेवाळे,डि. एस.उखर्डे, समाधान कांबळे, रवींद्र मोरे,प्रा.सुनिल बनसोडे, प्रा.डॉ.अरूण आहेर, सि.डी. उखर्डे, प्रा.रामदास भांगे, प्रा.के.जी.जाधव, प्रा.गजानन धोटे, प्रा.डॉ.आनंद जाधव, वासुदेव क्षिरसागर, उज्ज्वला आवटी, मंजुषा भिलावेकर, एफ.ए.शेख, ज्योतीताई जाधव, राजुभाऊ डोमळे, विजया लंबे, दिपक देशमुख आदींनी परिश्रम घेतले.अतिशय उत्साही वातावरणात शिक्षक पालक मेळावा संपन्न झाला.

## रंगनाथ महाराज कृषी महाविद्यालय नाव्हा नवीन विद्यार्थ्यांचा परिचय समारंभ उत्साह, प्रेरणा आणि स्नेहाच्या वातावरणात संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** शिक्षणा सोबत संस्कार, मैत्री आणि आत्मविश्वासाची जाणीव विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्याच्या उदात्त हेतूने रंगनाथ महाराज कृषी महाविद्यालय, नाव्हा येथे नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागताचा फ्रेशर्स वेलकम व परिचय समारंभ - २०२५ अत्यंत उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने हा कार्यक्रम संस्मरणीय बनला.




या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. डी. पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणीचे अधिष्ठाता डॉ. उदय खोडके, लक्ष्मण आण्णा कुलकर्णी, प्रा. डॉ. एस. डी. जेटूरे तसेच उद्योग क्षेत्रातील महिलांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सौ.रंगोली सोनूने पडघन आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचे हस्ते रंगनाथ महाराजांच्या प्रतिमेचे पूजन आणि दिपप्रज्वलन करुन करण्यात आली.प्रसंगी सर्व उपस्थितांनी सामुहिक रित्या विद्यापीठ गीत गायीले. विद्यार्थ्यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.प्रसंगी मान्यवर पाहुण्यांचे पुष्पगुच्छ, शाल-श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन स्वागत करण्यात आले.

प्रत्येक पाहुण्याच्या कार्याचे संक्षिप्त परिचय देताना सूत्रसंचालकांनी त्यांच्या कार्याची प्रेरणादायी झलक उपस्थितांना दिली.

कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात . संस्थेचे अध्यक्ष माजी आमदार राहुल बोंद्रे यांनी मेसेज द्वारे नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. सर्व प्राध्यापक, कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तीमत्व विकासा साठी प्रयत्नशील राहावे ,असे आवाहन ही केले .

विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील विविध विभाग, प्रयोगशाळा, संशोधन कार्य आणि प्राध्यापक वर्गा विषयी माहिती देण्यात आली. प्राचार्य डॉ.व्ही.डी. पाटील यांनी या प्रसंगी विद्यार्थ्यांना सांगितले की, महाविद्यालय हे फक्त शिक्षणाचे केंद्र नसून व्यक्तिमत्व विकासाचे व्यासपीठ आहे. येथे मिळणारे ज्ञान पुढील आयुष्याची वाट उजळवेल.

विद्यार्थ्यांचा परिचय आणि मनोरंजनमय कार्यक्रम यानंतर सुरू झालेला नवागत परिचय व मनोरंजन सत्र हा कार्यक्रमाचा सर्वात रंगतदार भाग ठरला. प्रत्येक नवीन विद्यार्थ्याने आपला परिचय देताना स्वतःच्या गावची, शैक्षणिक पार्श्वभुमीची व आवडी-निवडीची माहिती दिली. काही विद्यार्थ्यांनी कविता, नाट्यप्रयोग, विनोद, गायन आणि नृत्य सादर करून हास्याची आणि आनंदाची लहर पसरवली.

सूत्रसंचालकांनी सर्वांना विविध टास्क व लघु चॅलेंज पूर्ण करण्यास सांगून कार्यक्रम अधिक उत्साही बनवला. यशस्वीरीत्या टास्क पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना आकर्षक गिफ्ट देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या टप्प्यात रंगोली पडघन यांनी आपले अनुभव सांगताना विद्यार्थ्यांना आत्मविश्वास, मेहनत आणि निष्ठेचे महत्त्व पटवून दिले. त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले की, महाविद्यालयीन जीवन हे आयुष्याच्या पाया घालणारे दिवस असतात. या काळातील प्रत्येक प्रयत्न भविष्यात यशस्वी आयुष्य घडवणारा ठरतो.

प्रा. डॉ. एस. डी. जेटूरे म्हणाले की विद्यार्थ्यांनी आज पासूनच ध्येय निश्चित केले पाहिजे. तुम्ही जितके प्रामाणिक प्रयत्न कराल, तितके यश तुमच्या पर्यंत येईल. अभ्यासा सोबत स्वतःचे व्यक्तिमत्व घडवणे हेही तितकेच आवश्यक आहे. त्यांच्या भाषणास विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा गजर करीत प्रतिसाद दिला.

डॉ. उदय खोडके यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम, करिअरच्या संधी, तसेच कृषी क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान या विषयी सविस्तर माहिती दिली. कृषी क्षेत्र हे केवळ शेतकरी वर्गापुरतेच मर्यादित नसून जगण्यासह , जग बदलण्याचं ते एक शास्त्र आहे. नवीन पिढीच्या हातात हे शास्त्र अधिक सक्षम असेल तर भारताचे भविष्य उज्ज्वल करण्या साठी महत्त्वाचे साधन ठरते आहे. विद्यार्थ्यांन मधील जिद्द,जिज्ञासा,

कल्पकता, प्रयोगशीलता आणि नेतृत्वगुण विकसित करण्या साठी विद्यार्थांनी सदैव प्रयत्नशील राहावे ,असा आशावाद व्यक्त केला.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. व्ही. डी. पाटील यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांचा उल्लेख करत त्यात विद्यार्थांचे योगदान लक्षात घेत. सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन ही केले .शिक्षणाचा उद्देश फक्त गुण मिळवणे नाही, तर आयुष्य घडवणे आहे. शिस्त, चारित्र्य आणि मेहनतीने तुम्ही जगात कुठे ही उभे राहू शकता असा मौलिक संदेश देत सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाचा गौरव वाढवण्या साठी अभ्यासपूर्ण सामूहिक प्रयत्न करावेत असे आवाहन प्राचार्य डॉ.व्ही.डी.पाटील यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयातील विद्यार्थी वैष्णवी जाधव, करण माकोडे, तृप्ती पालकर, रोशनी प्रियंका मिसाळ , शिवानंद कोल्हे, शरद नागवे, अमोल ढोबळे या विद्यार्थ्यांनी उत्साही आणि रंगतदार पद्धतीने केले. त्यांच्या शब्दांनी संपूर्ण कार्यक्रमात प्रवाहीपणा आणि उत्साह निर्माण केला.तर आभार प्रदर्शन प्रा. किरण भोकरे यांनी केले.

या समारंभाचे खास वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांच्या सर्जनशील सादरीकरणाची झलक. नवागत तुमचं स्वागत आहे या गाण्यावर विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्याने महाविद्यालयात जल्लोष उडाला. प्रेक्षकांनी या सादरीकरणांचे कौतुक करून नवागत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.सदरील कार्यक्रमासाठी बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.

## वाद विवाद स्पर्धेत सावरगाव म्हस्के शाळेचा संघ द्वितीय



**विशाल देशमुख**
**टेंभुर्णी-** हुतात्मा जनार्दन मामा नागापूरकर तालुकास्तरीय वादविवाद स्पर्धेत सावरगाव म्हस्के येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेचा संघ द्वितीय आला आहे. जाफराबाद येथील जिल्हा परिषद प्रशालेत बुधवारी संपन्न झालेल्या या स्पर्धेत प्राथमिक गटातून या शाळेने हे यश संपादन केले आहे. संयुक्त कुटुंब पद्धत काळाची गरज आहे/नाही या विषयावर शाळेच्या विद्यार्थिनी पूजा भगवान म्हस्के व अनुजा नानासाहेब मस्के या दोघींनी उत्तम वाद-विवाद करून द्वितीय क्रमांक पटकावला. या विद्यार्थिनींना शाळेच्या शिक्षिका सुनीता देशपांडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. शाळेच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आत्माराम म्हस्के, उपाध्यक्ष नंदकिशोर काकडे, मुख्याध्यापक मुरलीधर वायाळ, शिक्षक सुखदेव चेके, गजानन डोमळे, भाऊसाहेब जाधव, कैलास जाधव, सुभद्रा घोडके, नसीम शेख आदींसह ग्रामस्थांनी कौतुक केले आहे. फोटो - तालुकास्तरीय वादविवाद स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावलेला सावरगाव म्हस्के शाळेचा संघ मान्यवरांकडून बक्षीस स्विकारताना.

# बसवकल्याणमध्ये २९ व ३० नोव्हेंबरला राष्ट्रीय अनुभव मंटप उत्सव

### दोन दिवशीय उत्सव परमपूज्य श्री डॉ. बसवलिंग पट्टद्देवरू यांच्या अध्यक्षतेखाली आंध्रप्रदेशचे राज्यपाल एस. अब्दुल नजीर यांच्या हस्ते उदघाटन

**जालना । प्रतिनिधी -** महात्मा बसवण्णा यांनी बाराव्या शतकात जगातील पहिल्या लोकशाही संसदेचे प्रारूप असलेल्या अनुभव मंटपाची स्थापना केली. ७७० शरणांच्या सामूहिक संवादातून वचन साहित्य निर्माण झाले. त्यातून घडून आलेली कल्याण क्रांती ही देशातील दु:ख, दारिद्रय, अज्ञान, अंधश्रद्धा, जातीयता, अस्पृश्यता आणि लिंगभेद संपुष्टात आणून सकल जीवात्म्यांच्या कल्याणासाठी कार्यरूपात आणलेली अप्रतिम अशी नवीनतम क्रांती होती. या क्रांतीच्या विचारांनी सर्वांच्या हृदयाची स्पंदने जागविण्यासाठी दरवर्षी 'अनुभव मंटप उत्सवा'चे आयोजित केले जाते. यावर्षी हा उत्सव नोव्हेंबर २९ व ३० रोजी बसवकल्याण येथे संपन्न होणार आहे.

दि. २९ नोव्हेंबर २०२५, शनिवार हा दोन दिवशीय उत्सव पूज्य श्री डॉ. बसवलिंग पट्टद्देवरू अप्पाजी यांच्या दिव्य सानिध्यात संपन्न होणार असून, दि. २९ नोव्हेंबर, सकाळी ११ वा. उत्सवाचे उद्घाटन आंध्रप्रदेशचे राज्यपाल माननीय श्री. एस. अब्दुल नजीर


### जालना जिल्हातील लिंगायत चळवळीतील व्यक्तिमत्व राजेंद्र वांजुळे विशेष सन्मान होणार

साहेब यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न होणार आहे. राज्याचे वन संपदा मंत्री ईश्वर खंड्रे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. केंद्र रेल्वे आणि जलशक्ती मंत्री श्री. वी. सोमण्णा यांच्या हस्ते २० ग्रंथांचे प्रकाशन होणार आहे. या प्रसंगी मुख्य अतिथी म्हणून राज्यमंत्री रहीम खान, बसवकल्याणचे आमदार मा. शरणू सलगर, उदगीरचे आमदार मा. संजय बनसोडे, तेलंगणातील नारायणखेडचे आमदार मा. पी. संजीवरेड्डी हे उपस्थित राहणार आहेत.

राष्ट्रीय पुरस्कार प्रदान : ज्येष्ठ चित्रकार श्री. सी. बी. सोमशेट्टी यांना -'श्री चन्नबसव पट्टद्देवरू पुरस्कार', ज्येष्ठ रंगकर्मी श्री. बसवराज बेंगेरी यांना -बसव भास्कर राष्ट्रीय पुरस्कार, ज्येष्ठ समाजसेविका डॉ. सुशीलम्मा यांना -'अनुभव मंटप राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात येणार असून, प्रत्येकी एक लाख रू. रोख आणि सन्मान पत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. ज्येष्ठ संशोधक डॉ. के. रवींद्रनाथ यांना - 'डॉ. एम. एम. कलबुरगी साहित्य-संशोधन राष्ट्रीय पुरस्कार' प्रदान करण्यात येणार असून पन्नास हजार रू. रोख आणि सन्मान पत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. तसेच, डॉ. उल्का आणि डॉ. मल्लिकार्जुन रकटे यांना -शरण वैद्य संगण्णा पुरस्कार, श्री. रमेश मोरगे आणि श्री सोमशंकर कारांमुगे यांना -शरण शेतकरी मुद्दण्णा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, प्रत्येकी दहा हजार आणि सन्मान पत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

दुपारी ३ वा. 'जागतिकीकरणामध्ये बसव विचारांची प्रस्तुतता' हा परिसंवाद आयोजित केला असून यामध्ये पूज्य श्री शरणबसव स्वामीजी यांचे व्याख्यान होणार आहे. संध्याकाळी ६ वा. 'शिवयोगी सिद्धरामेश्वर ' हे नाटक प्रदर्शित होणार आहे.

दि. ३० नोव्हेंबर २०२५ , रविवार सकाळी ८ वा. सामूहिक इष्टलिंग पूजा आणि सकाळी १० वा. 'लिंगायत आंदोलन आणि राष्ट्रीयता' हा परिसंवाद आहे. यामध्ये पूज्य श्री बसवानंद स्वामाजी यांचे व्याख्यान होणार आहे. दुपारी ३. वा. अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत समारोप समारंभ संपन्न होणार आहे. या उत्सवामध्ये कोल्हापूर शिवाजी विद्यापीठातील शरण साहित्य अध्यासनाचे समन्वयक डॉ. तृप्ती करीकट्टी, शिवशरण गोविंदे, अक्कलकोट, राजेंद्र वांजुळे, जालना, पुण्याचे संतोष मलशेट्टी, विजय पाटील संजय इंडे, नरसिंग मुळे, पत्रकार महादेव पाटील, उमरगा, रवी बिराजदार, लातूर आणि अड. नीलकंठ पाटील, नांदेड यांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे.



पूज्य डॉ. श्री बसवलिंग पट्टद्देवरू यांच्या अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे क्रांतीभूमी बसवकल्याण येथे कर्नाटक सरकार ६०० कोटी रू. खर्च करून नूतन अनुभव मंटप बांधत आहे, ही समस्त लिंगायतांना अभिमानास्पद गोष्ट आहे. बसवकल्याणमध्ये अनुभव मंटपाची भव्य-दिव्य इमारत उभी राहण्याबरोबरच, शरणांच्या विचारांचे जागर व्हावे आणि राष्ट्रव्यापी प्रसार व्हावा म्हणून पूज्य अप्पाजी महाराष्ट्र आणि तेलंगण राज्यातही कार्य करीत आहेत. यावर्षीच्या दोन दिवसांच्या उत्सवात विविध राज्यातून अधिक संख्येने सर्व समाज बांधवांनी सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र बसव परिषदेचे सचिव श्री. राजू जुबरे, राजेंद्र वांजुळे,यांनी केले आहे.

# शिवरायांच्या महाराष्ट्रात आईची अवहेलना? 'लाडकी बहीण' नव्हे, 'वंदनीय माऊली' योजनेची गरज!

## ॲड. महेश एस. धन्नावत यांचे परखड मत

**जालना । प्रतिनिधी -** ज्या मुलाला नऊ महिने पोटात वाढवलं, त्याला मोठं करण्यासाठी रक्ताचं पाणी केलं, त्याच मुलाने आजारपणात रुग्णालयात वाऱ्यावर सोडून दिलं, ही व्यथा आहे मुंबईतील एका ७६ वर्षीय वृद्ध आईची. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणावर तीव्र नाराजी व्यक्त करत मुलाच्या वागणुकीला क्षमा न करण्याजोगा गुन्हा म्हटले आहे. या घटनेने केवळ न्यायालयाच्याच नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या सद्सद्विवेकबुद्धीला धक्का दिला आहे. या पार्श्वभूमीवर, नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ॲड. महेश एस. धन्नावत यांनी एक भावनिक आणि तितकेच परखड निवेदन जारी केले आहे.

मुंबईतील एका मुलाने आपल्या ७६ वर्षीय आईला ऑगस्ट महिन्यात वांद्रे येथील होली फॅमिली रुग्णालयात दाखल केले. सुरुवातीला काही खर्च केल्यानंतर, त्याने वैद्यकीय हलगर्जीपणाचा आरोप करत रुग्णालयाचे सुमारे १६ लाख रुपयांचे बिल थकवले. इतकेच नाही, तर आईला घरी घेऊन जाण्यास किंवा दुसऱ्या सुविधेत हलवण्यासही स्पष्ट नकार दिला. आईची प्रकृती आता स्थिर असूनही तिला घरी नेण्यास कोणीही नसल्याने, रुग्णालयाला अखेर उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागली. न्यायालयाने या मुलाच्या वर्तनाची कठोर शब्दात निंदा केली आणि आईला तिच्याच नावावर असलेल्या घरातून किंवा तिच्या मालमत्तेतून बेदखल करण्यावर तात्काळ बंदी घातली. मुंबई उच्च न्यायालयासमोर आलेले हे प्रकरण म्हणजे समाजाच्या ढासळत्या नैतिकतेचे प्रतिबिंब आहे. ज्या भूमीत छत्रपती शिवाजी महाराजांनी परस्त्रीलाही मातेचा दर्जा दिला, तिथे जन्मदात्या आईची अशी अवस्था होणे हे अत्यंत दुर्दैवी आणि चिंताजनक आहे, असे ड. धन्नावत यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे.

ॲड. धन्नावत पुढे म्हणाले, आपल्या सर्वांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील तो प्रसंग आठवला पाहिजे, जेव्हा कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला त्यांच्यासमोर हजर करण्यात आले. तिच्या सौंदर्याकडे पाहून महाराज म्हणाले, 'अशीच असती आमची आई सुंदर रूपवती, आम्हीही सुंदर झालो असतो वदले छत्रपती!' ज्या राजाने शत्रूच्या स्त्रीलाही आईचा सन्मान दिला, त्यांच्या महाराष्ट्रात आज आपल्याच आईला रुग्णालयात सोडून देण्याची वेळ यावी, हे आपले वैचारिक अधःपतन दर्शवते. महाराजांनी जिजाऊ मासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली स्वराज्य स्थापन केले; आईचा आदर हा त्यांच्या मूल्यांचा गाभा होता. आज आपण तोच आदर विसरत चाललो आहोत.

या घटनेतून प्रत्येकाने एक धडा घेतला पाहिजे. आता केवळ मुलांवर अवलंबून राहण्याचे दिवस गेले. प्रत्येक व्यक्तीने आपल्या तारुण्यातच सेवानिवृत्तीचे (Retirement Planning) योग्य नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. आर्थिक स्वावलंबन हेच वृद्धापकाळातील सर्वात मोठे संरक्षण आहे, असा सल्लाही त्यांनी दिला.

सरकारी योजनांवर टीका करताना ड. धन्नावत म्हणाले, सरकार 'लाडकी बहीण' सारख्या लोकप्रिय योजनांवर करोडो रुपये खर्च करते. महिला सक्षमीकरण महत्त्वाचे आहेच, पण ज्या ज्येष्ठ नागरिकांना, विशेषतः वृद्ध महिलांना आज आधाराची खरी गरज आहे, त्यांच्यासाठी ठोस योजना का आखल्या जात नाहीत? अशा योजना बंद करून तो निधी ज्येष्ठ नागरिकांसाठी समर्पित आरोग्य विमा किंवा पेन्शन योजनेसाठी वापरावा. जेणेकरून कोणत्याही आई-वडिलांवर मुलांच्या दयेवर जगण्याची वेळ येणार नाही.

ॲड. धन्नावत यांनी कायद्याच्या भूमिकेवरही प्रकाश टाकला. पालक आणि ज्येष्ठ नागरिकांची देखभाल आणि कल्याण अधिनियम, २००७ नुसार, ज्येष्ठ नागरिकांना सोडून देणे हा एक फौजदारी गुन्हा आहे. तसेच, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम १२५ आणि आता नवीन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १४४ नुसार, मुलांना आपल्या पालकांची देखभाल करणे बंधनकारक आहे. मात्र, केवळ कायदे करून उपयोग नाही, तर त्यांची कठोर अंमलबजावणी आणि समाजात नैतिक मूल्यांची रुजवणूक करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. एखाद्या समाजाची ओळख ही तो आपल्या सर्वात दुर्बळ घटकांशी (ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुले) कसा वागतो, यावरून ठरते. आता वेळ आली आहे की, सरकारने आणि समाजाने एकत्र येऊन प्रत्येक ज्येष्ठ नागरिकाला सन्मानाने जगण्याचा हक्क मिळवून दिला पाहिजे.

# रोटरी रेनबो क्लबतर्फे जालन्यात २७ व २८ नोव्हेंबर रोजी शिक्षण उत्सवाचे आयोजन

## विविध कार्यक्रमांचा समावेश

**जालना । प्रतिनिधी -** शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत असलेल्या रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोतर्फे इयत्ता नववी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी येत्या २७ व २८ नोव्हेंबर रोजी जेईएस महाविद्यालयात दोन दिवशीय एज्युफेस्ट अर्थात शिक्षण उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन व व्यक्तिमत्व विकासाबद्दल विविध तज्ञांच्या माध्यमातून उद्बोधन करणे, हा या उत्सवाचा उद्देश आहे. शिक्षण उत्सवाचे उद्घाटन २७ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता जिल्हा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी. एम. यांच्या हस्ते होणार असून प्रमुख पाहुणे म्हणून माध्यमिक शिक्षणाधिकारी श्री. खरात, रोटरीचे प्रांतपाल सुधीर लातुरे, माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू आणि डॉ. विजय जेथलिया यांची उपस्थिती राहणार आहे.

या कार्यक्रमात अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी यांची प्रकट मुलाखत विद्यार्थी घेणार आहेत. दोन दिवसीय उत्सवात सुभाष बोंद्रे, जगदीश कुडे, ड. दीपक कोल्हे, सौ. ईश्वरी चव्हाण आणि जेईएस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. दोन दिवस सकाळी १० ते ४ या वेळेत हा उत्सव जाणार आहे. याप्रसंगी आयोजित करण्यात येणाऱ्या विज्ञान प्रदर्शनीत जनता हायस्कूल, शिवाजी हायस्कूल, सरस्वती भुवन, जैन विद्यालय, संस्कार प्रबोधिनी विद्यालय, सुरेखा प्राथमिक विद्यालय, पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, एमआरडीए स्कूल, ज्ञानज्योत विद्यालय, सिंधी हिंदी विद्यालय, महाराष्ट्र हायस्कूल, दानकुवर विद्यालय, शांतिनिकेतन विद्यालय, सेंट मेरी स्कूल आदी १५ विद्यालयातील विद्यार्थी आपले प्रयोग सादर करणार आहेत. या शिक्षण उत्सवाचा विद्यार्थी आणि शिक्षणप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन असे रोटरी क्लब ऑफ जालना रेनबोच्या अध्यक्षा डॉ. प्रतिभा श्रीपत आणि सचिव पंकज लड्डा यांनी केले आहे.

# दुर्गामाता विद्यालयात बाल दिन सप्ताह साजरा

**भोकररदन -**तालुक्यातील दुर्गामाता विद्यालय सोयगांव देवी येथे महिला व बाल विकास कार्यालय जालना यांच्या वतीने सखोल मार्गदर्शन करण्यात आले,जिल्हा महिला व बाल विकास कार्यालय जालना यांच्या मार्गदर्शन खाली बाल दिन सप्ताह आणि बाल विवाह मुक्त भारत अभियानाअंतर्गत २२ नोव्हेंबर रोजी बालक संरक्षण विषयी जनजागृति कार्यक्रम पार पडला तसेच बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००५ पॉक्सो अधिनियम २०१२ चाइल्ड हेल्प लाईन १०९८ महिला हेल्पलाइन १८१ तसेच सखी वन स्टॉप सेंटर ची माहिती देण्यात आली व इमर्जन्सी पोलीस ११२ नंबरची माहिती देण्यात आली

# गुरुकुल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी क्षेत्र भेट संपन्न



**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** गुरुकुल इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, यांच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक उपक्रमांतर्गत ग्रामीण रुग्णालय, भोकरदन तसेच पाणी शुद्धीकरण केंद्र (वॉटर फिल्टरेशन प्लांट) येथे शैक्षणिक क्षेत्रभेट (Field Visit) आयोजित करण्यात आली.

या क्षेत्रभेटी दरम्यान विद्यार्थ्यांना ग्रामीण रुग्णालयातील विविध विभाग, आरोग्य सेवा पद्धती, औषध वितरण प्रक्रिया, आपत्कालीन उपचार पद्धती तसेच रुग्णसेवेसाठी वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक साधनांची माहिती मिळाली. रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे देत उपयुक्त माहिती प्रदान केली.

त्यानंतर विद्यार्थ्यांनी पाणी शुद्धीकरण केंद्राला भेट देऊन पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया, वापरली जाणारी यंत्रसामग्री, फिल्ट्रेशनच्या टप्प्यांची माहिती तसेच स्वच्छ व सुरक्षित पाणी जनतेपर्यंत कसे पोहोचवले जाते याबाबत प्रत्यक्ष ज्ञान प्राप्त केले.

या शैक्षणिक क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांचे व्यवहारज्ञान वाढून त्यांच्या शैक्षणिक प्रक्रियेत महत्त्वपूर्ण भर पडली आहे. संस्थेचे अध्यक्ष माजी सभापती एल.के.दळवी, प्राचार्य व प्राध्यापक यांनी या उपक्रमाचे नियोजन करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून शिक्षण मिळविण्याची संधी उपलब्ध करून दिली.

# प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हा पदाधिकाऱ्यांची आज महत्त्वाची बैठक

**जालना । प्रतिनिधी -** येथील पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणारी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हा पदाधिकाऱ्यांची रविवार (दि २३) रोजी महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी दिली. आगामी कार्यक्रमांसदर्भातील रुपरेषा, मागण्या संदर्भातील पाठपुरावा व इतर विषयावर या बैठकीत चर्चा होणार असून यासाठी सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन दीपक शेळके यांनी केले आहे.

# महसूल सेवक व पोलीस पाटील यांनी कायद्यांच्या अंमलबजावणीसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करावा - जिल्हाधिकारी आशिमा मित्तल




**जालना । प्रतिनिधी -** गावाच्या सुरक्षेची पहिली जबाबदारी पोलीस पाटीलांवर असून त्यांनी आपली कर्तव्ये प्रामाणिकपणे, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून आणि सामाजिक जबाबदारी जपत पार पाडावी,तसेच महसूल सेवक यांनी देखील काम काज करतांना कायद्याची योग्य अंमलबजावणी करणे व कामात गतिमानता व अचूकता येण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले.

दि. २२ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात महसूल भवन येथे पोलीस पाटील व महसूल सेवक यांना त्यांच्या पदाची जबाबदारी अधिकार आणि प्रशासकीय कार्यप्रणाली यासंबंधी सखोल ज्ञान आणि कौशल्ये प्रदान करण्याच्या उद्देशाने, तसेच ग्राम पातळीवरील कामकाज करण्याकरिता सुलभता येण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने आयोजित एक दिवसीय विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी व्यासपीठावर अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उप विभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, उप विभागीय अधिकारी उमाकांत पारधी,पोलीस निरीक्षक मिथुन घुगे, नायब तहसीलदार विक्रांत मोंढे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था अधिव्याख्याता डॉ. प्रमोद कुमावत, डॉ. योगेश्वर जाधव,शरद जोशी, अण्णासाहेब वाघमारे यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, डिजिटल युगात तंत्रज्ञानाचा वापर हा अत्यावश्यक झाला आहे. महसूल सेवक यांनी ग्रामीण भागात कामकाज करतांना ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत तसेच काम करतांना आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून आपल्या कामाचा वेग व अचुकपणा वाढवावा. विविध शासकीय प्स, पोर्टल, गावातील सीसीटीव्ही प्रणाली, तक्रार नोंदणी यंत्रणा यांचा योग्य वापर करून गावातील सुरक्षाव्यवस्था अधिक मजबूत करता येते. नागरिकांशी सातत्याने संवाद ठेवत, त्यांच्या समस्या त्वरित संबंधित विभागांपर्यंत पोहोचविण्यावर त्यांनी भर द्यावा.गावात शांतता, सलोखा व सामाजिक ऐक्य राखणे ही सुद्धा पोलीस पाटीलांची महत्त्वाची सामाजिक जबाबदारी असल्याचे जिल्हाधिकारी मित्तल यांनी यावेळी नमूद केले. महिलांच्या सुरक्षेबाबत जागरूकता, बालसंरक्षण, व्यसनमुक्ती, वाहतूक नियमांचे पालन यासारख्या उपक्रमांत सक्रिय सहभाग अपेक्षित असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी कृत्रिम बुद्धिमत्ता, ताणतणाव व्यवस्थापन महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम १९८७ अधिकार, कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या, महत्त्वाची माहिती, नैसर्गिक आपत्ती, गंभीर गुन्हे व दुर्घटनांची माहिती तात्काळ पोलीस आणि महसूल विभागास कळविणे, गौण खनिज कार्यवाही. ग्राम सभा आणि शासकीय योजना, शासकीय योजनांची माहिती गावातील नागरिकांपर्यंत पोहोचवणे आणि ग्रामसभेत सहभाग,परिचय व शिष्टाचार, शासकीय कर्मचाऱ्यांशी व नागरिकांशी योग्य संवाद आणि वर्तवणूक.गुन्हा आणि पुरावा, एफआयआर (ऋखठ) नोंदवताना सहाय्य करणे, पंचनामा आणि साक्षीदारांची माहिती.शांतता आणि सुव्यवस्थाः गावात कायदा व सुव्यवस्था राखणे, तंटामुक्ती अभियान व प्रतिबंधात्मक उपाययोजना.

प्रशिक्षणावर आधारित प्रश्नमंजुषा, महसूल विभागातील कार्य दप्तर सांभाळणे, शेत-जमिनीच्या नोंदी (७/१२) मध्ये मदत करणे, वसूली, आचारसंहिता, प्रशासकीय समन्वय महसूल अधिकारी व तलाठी यांना दैनंदिन कामात सहाय्य करणे, ई-पिकपाहणी, अनुदान यादी, जिवंत ७/१२, ई-के.वाय.सी, दप्तर आणि नोंदीः कार्यालयातील महत्त्वाच्या कागदपत्रांची ने-आण करणे आणि शासकीय नोंदी अद्ययावत ठेवणे.सरकारी मालमत्तेची देखभाल शासकीय इमारती आणि परिसराची देखभाल करणे. व गौण खनिज कार्यवाही याविषयी तज्ञांनी मार्गदर्शन केले.

सदरील प्रशिक्षणास जिल्हातील ३४५ पोलीस पाटील व २०० हून अधिक महसूल सेवकांची उपस्थिती होती. उपस्थित प्रशिक्षणार्थी यांनी मा. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित उपक्रमामुळे गावपातळीवर काम करण्यास नक्कीच प्रोत्साहन व दिशा मिळेल असे मत व्यक्त केले.

# नगराध्यक्ष उमेदवार सौ.शांताबाई हिवाळे व प्रभागातील उमेदवारांच्या प्रचारासाठी जाहीर सभा संपन्न

परतूर । प्रतिनिधी - परतूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ. शांताबाई बाबुराव हिवाळे तसंच सर्व प्रभागातील उमेदवारांच्या प्रचारासाठी आज जाहीर सभा उत्साहात पार पडली. यानिमित्तानं काही पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला. सर्वांचं मनापासून स्वागत केलं, पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थितांना संबोधित केलं.

ह्या निवडणुकीला अवघे दहा दिवस शिल्लक राहिले असताना या काळात परतूरवासीयांची साथ, विश्वास आणि पाठिंबा फार महत्त्वाचा आहे. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. शांताबाई हिवाळे या प्रामाणिक, जमिनीवर पाय ठेवून काम करणाऱ्या महिला आहेत. अनुभवी, नवीन, तरुण वर्ग अशा पद्धतीनं सर्वांचं मिश्रण असलेले उमेदवार पक्षाच्या वतीनं जनसेवेखातर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. सर्व समाजघटकांना बरोबर घेऊन पुढे जाण्याचा आमचा प्रयत्न आहे. ही निवडणूक फक्त निवडणूक नाही; ही परतूरच्या विकासाची दिशा ठरवणारी निवडणूक आहे.

शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांनी पुढे जाणारा कार्यकर्ता म्हणून मी सर्व महामानवांना आणि परतूरच्या आराध्य दैवत पातेश्वर महादेवाला नमन करतो.

परतूरचा विकास फक्त नियोजनबद्ध नसावा, तर तो सर्वसमावेशक असला पाहिजे. सर्व समाज, सर्व घटक, सर्व पिढ्या सोबत घेऊन जाणारा असला पाहिजे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार निवडून आल्यास पुढील ५ वर्ष निधीची कधीच कमतरता पडू देणार नाही, अशी हमी सभेच्या निमित्तानं दिली. ज्या पद्धतीनं बारामती, पिंपरी-चिंचवडमध्ये विकासकामं झाली आहेत, त्याच पद्धतीनं आता राज्यभर आणि परतूरमध्येही विकास घडवून आणायचा आहे, असं स्पष्ट केलं.

परतूरचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी, सर्व समाजात सलोखा टिकवण्यासाठी सौ. शांताबाई हिवाळे यांच्यासह पक्षाचे सर्व उमेदवार प्रामाणिकपणे काम करतील, यात काही शंका नाही. त्यामुळे मतदारराजानं फक्त घड्याळ चिन्हावर बटण दाबावं, असं आवाहन केलं. त्याचप्रमाणे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्व कार्यकर्त्यांनी जोमानं कामाला लागावं, असं देखील सूचित केलं.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.